# MT - 162

**Seat No.** | | | | | | | |

2019 ___ ___ 1100

**MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM - I - PAPER - VI**

**Time : 3 Hours** **(Pages 11)** **Marks : 100**

कृतिपत्रिकेसाठी सूचना

(१) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यामधील आकृत्या काढाव्यात.

(२) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(३) उपयोजित लेखनातील प्रश्नांसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच हे प्रश्न लिहून घेऊ नयेत.

(४) विभाग ५ - उपयोजित लेखन प्र. ५ (अ) (२) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र. १ (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.

(५) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

## विभाग – १ : गद्य

### पठित गद्य

**प्र.१. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) (i) कृती पूर्ण करा.** १

**शनिवार पेठेशी संबंधित वस्तू**

↓ [ ] ↓ [ ]

**(ii) एका शब्दात उत्तर लिहा.** १

लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले ते साल. –

मी २००४ साली मराठी साहित्य संमेलनाचा बिनविरोध अध्यक्ष झालो. तत्कालीन एक-दोन वर्षांत माझ्यावर शालींचा वर्षाव झाला. एवढ्या शाली जमत गेल्या, की माझ्या आठ बाय सहाच्या खोलीत त्यांना ठेवणेच शक्य नव्हते. मग मी सगळ्या शालींचे गोठोडे बांधून ते निकटवर्ती मित्राकडे ठेवले व त्या शाली वापरण्याचे वगैरे त्याला सर्वाधिकार दिले. बिचारा अतिप्रामाणिक! त्याच्याही छोट्या खोलीत त्याने ते सांभाळले.

हळूहळू मी सगळ्या शाली वाटून टाकल्या, गरीब श्रमिकांना!

याच सुमारस मी शनिवार पेठेतील ओंकारेश्वर मंदिराच्या पुलावर बहुधा रोज संध्याकाळी जात असे. तेथील कट्ट्यावर बसणे मला आवडे. एक दिवस काय घडले, की कडक थंडीच्या दिवसात एक म्हातारा, अशक्त भिक्षेकरी कट्ट्याला लागूनच चिरगुटे टाकून व पांघरून कुडकुडत बसल्याचे मी पाहिले.

दुसऱ्या दिवशी मी दोन शाली घेऊन ओंकारेश्वराच्या कट्ट्यावर आलो. तो म्हातारा होताच. त्याला दोन्ही शाली दिल्या. त्याने थरथरत्या हातांनी मला नमस्कार केला.

**(२) कंसातील योग्य पर्याय निवडून रिकामी जागा भरा.** १

**(i)** त्याने थरथरत्या हातांनी मला ·············· केला.(नमस्कार, अभिवादन, नमस्ते, सलाम)

**(ii) चूक की बरोबर ते लिहा.** १

लेखकांनी सर्व शालींचे गाठोडे बांधून मित्राकडे दिले.

**(३) व्याकरण :**

**(i) समानार्थी शब्द लिहा.** १

(अ) कष्टकरी – [ ] (आ) कर – [ ]

**(ii) कंसातील शब्दाला योग्य विभक्ती प्रत्यय लावून वाक्य पुन्हा लिहा.** १

एक-दोन वर्षांत माझ्यावर (शाली) वर्षाव झाला.

**(४) स्वमत :** २

भिक्षेकऱ्याने केलेला शालींचा उपयोग याविषयी तुमचे मत लिहा.

**प्र.१. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) (i) आकृती पूर्ण करा.** १

**व्हर्च्युअल गोष्टीबद्दल नाराजी व्यक्त करणारे**

↓

[ ]

**(ii) कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** १

किती प्रचंड ................ चिकटलेला असतो, आपल्या पायांना!

(कार्बन, नायट्रोजन, ऑक्सिजन, गॅस)

"पावडेकाकूंनी कुंडीतल्या रोपांकरिता माती मागितली तर ती आणून देणं होत नाही काकांना, ते झाडं काय लावणार ?" स्नेहलनं एकदम स्ट्रेट ड्राईव्ह लगावला. सुमितनं पावडेकाकांची आणखी काही माहिती घेतली आणि ॲपवर भरली. पुन्हा निळा तुकडा चमकला आणि काही क्षणातच त्या निळ्या तुकड्यावर पावडेकाकांची पावलं उमटली.

दोन काळीकुट्ट पाऊलचिन्हे!!

आणि खाली शब्द आले

'सॉरी, यू हॅव डर्टीएस्ट फूटप्रिन्टस. परफेक्ट ब्लॅक फूटप्रिन्टस.' पावडेकाकांचा चेहरा एकदम पडला. "काय नाटक आहे हे? असल्या व्हर्च्युअल गोष्टी नका सांगू मला," पावडेकाका रागाने म्हणाले. सुमितनं त्यांच्या नाराज चेहऱ्याकडं पाहिलं आणि तो समजावणीच्या सुरात म्हणाला, "माफ करा, काका; पण ही पावलं व्हर्च्युअल नाहीत, उलटपक्षी ती अधिक खरीखुरी आहेत. काका, हे ॲप आपल्या दैनंदिन व्यवहारात आपण किती कार्बन वातावरणात सोडतो, हे मोजतं. थोडक्यात आपल्या जीवनशैलीतून उमटणाऱ्या आपल्या कार्बन प्रिन्टस रेखाटतं. त्या आपल्याला उघड्या डोळ्यांना दिसत नाहीत. आता तुम्ही वीस कि.मी. अंतर तुमच्या कारनं येता, तेव्हा तुम्ही किमान एक लीटर पेट्रोल जाळता म्हणजेच त्याच्या दुपटीहून अधिक कार्बन डायॉक्साईड वातावरणात सोडता!"

"काहीतरीच! मला नाही पटत," काका म्हणाले.

"काका, हे एक शास्त्रीय सत्य आहे. तुमच्या कार्बन सोडण्याच्या प्रमाणावरून तुमच्या पावलांचा काळा रंग ठरतो. रेखामावशींच्या रोजच्या जगण्यात कार्बन उत्सर्जनाला वावच नाही, म्हणून तर त्यांची पावलं आपल्यापेक्षा अधिक सुंदर, चंदेरी आहेत," सुमित बोलत होता. "बापरे, आपण फरशी घाण होण्याची गोष्ट करतो; पण आपण तर अवघं वातावरणच घाण, प्रदूषित करत असतो. किती प्रचंड कार्बन चिकटलेला असतो, आपल्या पायांना! ग्लोबल वॉर्मिंगला हातभार लावतो आपण. तापानं फणफणलीय आपली धरती, आपल्या पायाला चिकटलेला हा कार्बन आपल्याला धुवायला हवा".

(२) (i) **एका वाक्यात उत्तर लिहा.** १

पावलांचा काळा रंग कशावरून ठरतो?

(ii) **कोण कोणास म्हणाले?** १




(३) **व्याकरण**

(i) **अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.** १

त्या निळ्या तुकड्यावर पावडेकाकांची <u>पावलं</u> उमटली.

(ii) **अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य पुन्हा लिहा.** १

<u>पावडेकाकूंनी</u> कुंडीतल्या रोपांकरता माती मागवली.

**(४) स्वमत** २

ग्लोबल वॉर्मिंगला आपण प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कशाप्रकारे हातभार लावतो हे तुमच्या अनुभवातून लिहा.

**अपठित गद्य**

**प्र.१ (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) खालील कृती पूर्ण करा.** २

(i) खरा ध्येयवादी याला म्हणावा - ☐

(ii) आफ्रिकेत धर्मोपदेश करणार नाही तर - ☐

कशासाठी काय सोडायचे हे ज्याला बरोबर कळते तोच खरा ध्येयवादी. तिथेच त्याचा खरा कस लागत असतो. 'मी आफ्रिकेत धर्मोपदेश करणार नाही. फक्त वैद्यकीय मदतीचे काम करीन' असे वचन डॉ. खाइत्झर यांनी दिले होते. आणि पियानोची पेटी उघडून पाहायलाही त्यांना कित्येक दिवस सवड मिळाली नाही. लोकमान्य टिळक नेहमी म्हणत असत, 'देशाच्या स्वातंत्र्याचा लढा मला लढायचा नसता तर मी गणिताचा प्राध्यापक होऊन राहिलो असतो.' गणित हा लोकमान्यांचा आवडता विषय; पण देशाच्या सेवेसाठी त्यांनी तो सोडून दिला. ध्येयापुढे आवड बाजूला सारावी लागते. आवड म्हणजे तरी सुखच, ध्येयाशी मैत्री करावयाची तर सुखाची संगत सोडावीच लागणार. संत तुलसीदासांनी प्राणापलीकडे प्रेम असलेली पत्नी देवासाठी सोडली. देवाच्या सेवेसाठी पत्नीचा त्याग केला आणि धर्माच्या सेवेसाठी संभाजी महाराजांनी तर देहत्याग केला.

**(२) फक्त नावे लिहा.** २

(i) लोकमान्य टिळक यांचा आवडीचा विषय - ☐

(ii) संत तुलसीदासांनी यांचा त्याग केला - ☐

(iii) ध्येयाशी मैत्री करायची तर हे सोडावे लागते - ☐

(ii) धर्माच्या सेवेसाठी संभाजी महाराजांनी त्याग केला - ☐

**(३) व्याकरण**

**खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांचे वचन बदलून वाक्य लिहा.** २

(i) फक्त वैद्यकीय मदतीचे <u>काम</u> करीन.

(ii) ध्येयापुढे <u>आवड</u> बाजूला साराव्या लागतात.

**(४) स्वमत** २

'संत तुलसीदास' यांच्याबद्दल तुम्हाला माहीत असलेली माहिती लिहा.

विभाग – २ : पद्य

प्र.२ (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

(१) जोड्या जुळवा. २

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (i) | कनवाळू | (अ) | चातक |
| (ii) | भुकेलें | (ब) | हरणी |
| (iii) | चिंतीत | (क) | माता |
| (iv) | विनवितो | (ड) | वत्सरू |
| | | (इ) | धेनु |

अग्निमाजि पडे बाळू ।
माता धांवें कनवाळू ।।१।।

तैसा धांवें माझिया काजा ।
अंकिला मी दास तुझा ।।२।।

सर्वेंचि झेंपावें पक्षिणी ।
पिलीं पडतांचि धरणीं ।।३।।

भुकेलें वत्सरावें ।
धेनु हुंबरत धांवे ।।४।।

वणवा लागलासे वनीं ।
पाडस चिंतीत हरणी ।।५।।

नामा म्हणे मेघा जैसा ।
विनवितो चातक तैसा ।।६।।

(२) (i) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. १

बाळाला वाचवण्यासाठी कोण धावून येते ?

(ii) खाली दिलेल्या कंसातील योग्य पर्याय निवडून अभंगांच्या ओळी पूर्ण करा. १

भुकेलें वत्सरावे। ..... हुंबरत धांवे ।। (हरिणी, पक्षिणी, धेनु, गाय)

(३) खालील काव्यपंक्तीतील आशयसौंदर्य स्पष्ट करा. २

'अग्निमाजि पडे बाळू । माता धांवें कनवाळू ।।
तैसा धांवें माझिया काजा । अंकिला मी दास तुझा ।।'

(४) संत नामदेवांनी परमेश्वराकडे केलेली विनंती सोदाहरण स्पष्ट करा. २

प्र.२ (आ) 'दोन दिवस' व 'हिरवागार झाडासारख' या दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.

(१) कवी/कवयित्री : – १

(२) कवितेचा रचनाप्रकार : – १

(३) कवितेचा काव्यसंग्रह : – १

(४) कवितेतून व्यक्त होणारा भाव (स्थायी भाव) : – १

(५) कवितेतील आवडलेली ओळ : – २

(६) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे : – २

प्र.२ (इ) खालील ओळींचे रसग्रहण करा. ४

फुलामुलांतून हसतो श्रावण
मातीचे हो मंगल तनमन
चैतन्याचे फिरे सुदर्शन
शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार।।

## विभाग – ३ : स्थूलवाचन

प्र.३ खालील कोणत्याही दोन कृती सोडवा. ६

(१) टिपा लिहा. - बार्क

(२) टिपा लिहा.




(३) कुठल्याही दोन भाषा बोलणारे भाषिक जेव्हा एकमेकांच्या संपर्कात येतात, तेव्हा त्यांच्या भाषांतील शब्दांची देवाणघेवाण होते. त्यावरून शब्द तयार होतात.

चौकट पूर्ण करा:

| भाषा | मूळ शब्द | मराठी शब्द |
|---|---|---|
| संस्कृत | तुण्ड | ...... |
| ....... | तुप्प | तूप |
| अरबी | ..... | अत्तर |

## विभाग – ४ : भाषाभ्यास

**प्र.४ (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

**(१) समास** २

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (i) | गोल्लोगल्ली | - - - - - | - - - - - |
| (ii) | पुणे मुंबई | - - - - - | - - - - - |

**(२) अलंकार** २

**खालील उदाहरण कोणत्या अलंकाराचे आहे हे ओळखून त्याच अलंकाराचे दुसरे उदाहरण लिहा.**

उदा - 'नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।।

**(३) वाक्यरूपांतर** २

**कंसातील सूचनेसुसार कृती करा.**

(i) ते काम खूप मोठे आहे. (नकारार्थी करा.)

(ii) तुझ्या भेटीने खूप आनंद झाला. (उद्‌गारार्थी करा.)

**(४) सामान्यरूप** २

**खालील शब्दांचे सामान्यरूप व विभक्ती प्रत्यय लिहून तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय |
|---|---|---|---|
| (i) | प्रत्येकाने | - - - - - | - - - - - |
| (ii) | नियमात | - - - - - | - - - - - |

**(५) वाक्प्रचार** २

**कंसातील वाक्प्रचारांचा योग्य उपयोग करून वाक्ये पुन्हा लिहा**

(आनंद गगनात न मावणे, हेवा वाटणे, नाव उज्ज्वल करणे)

(i) आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये कौस्तुभने बुद्‌धिबळ खेळात शाळेचे नाव उंचावले.

(ii) अचानक दारात मामा मामींना बघून सर्वांना खूप आनंद झाला.

प्र.४ (आ) भाषासौंदर्य

(१) **खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.** १

(i) शेतातून जाणारी अरूंद वाट - ☐

(ii) कीर्तन करणारा - ☐

(ii) **खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** १

(अ) नकारार्थी - ☐ (आ) खाजगी - ☐

(iii) **पुढील शब्दांचे दोन भिन्न अर्थ लिहा.** १

☐ ← वाणी → ☐

(iv) **खालील शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा. ('रंग' व 'मंचावर' हे शब्द सोडून)** १

रंगमंचावर -

(२) **लेखननियमानुसार लेखन -**

(i) **खालील वाक्ये लेखननियमानुसार शुद्ध करुन लिहा.** १

तिथे नदीकाठच्या प्राद्न्य पाठशाळेच्या खोलीत मि रहात असे.

(ii) **अचूक शब्द ओळखून लिहा.** १

(अ) वर्तुळाकार, वर्तूळाकार, वर्तळाकार, वर्तुळआकार -

(आ) प्रसीद्ध, प्रसिध्ध, प्रासीद्ध, प्रसिद्ध -

(३) **विरामचिन्हे** २

**खालील वाक्यातील चुकीची विरामचिन्हे बदलून लिहा.**

(i) त्यांच्या ''विशाखा" या काव्यसंग्रहाला मानाचा ''ज्ञानपीठ" पुरस्कार मिळाला;

(ii) माझ्या आईवडिलांना वाय. एम. सी. ए. मधील खेळाडूंकडून माझ्या खेळाबाबत स्तुतीपर उद्गार ऐकू येऊ लागले होते.

(४) **पारिभाषिक शब्द -**

**खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.** १

(i) Drama -

(ii) Computer -

(५) **भाषिक खेळ -** १

**खालील शब्द अकारविल्हेनुसार लावा.**

वैभव, शारदा, वीणा, शीतल

**विभाग – ५ : उपयोजित लेखन**

**प्र.५ (अ) (१) पत्रलेखन**

**खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.** ५

**दैनिक वृत्तपत्र**
आमच्या वार्ताहराकडून
सार्वजनिक बागेचे सुशोभिकरण
स्थानिक नगरसेवकांच्या पुढाकाराने कऱ्हाड येथील मध्यवर्ती वस्तीतील बागेचे सुशोभिकरण करण्यात आले. अनेक प्रकारची फुलझाडे व क्रीडासाहित्य यांनी परिसराचे रूप बदलून गेले.
परिसरातील नागरिकांनी मा. नगरसेवकांना धन्यवाद दिले.

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

शाळेच्या बागेचे सुशोभिकरण करण्यासाठी मार्गदर्शन करणेबाबत मा. नगरसेवकांना विनंती करणारे पत्र लिहा.

बागेतील फुलझाडे यांच्या संबंधीच्या माहितीपत्रकाची मागणी करणारे पत्र बागेच्या मा. व्यवस्थापकांना लिहा.

**(२) सारांश लेखन** ५

**विभाग -१ गद्य विभागातील प्र १ मधील अपठित उताऱ्याचा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

**प्र.५ (आ) खालील कृती सोडवा.**

**(१) जाहिरात लेखन**

**खालील जाहिरात वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

**★ आरोग्यम् धनसम्पदा ★**
वाळके शक्ती व्यायामशाळा
**प्रो. विशाल वाळके यांची व्यायामशाळा**
**योगासने व व्यायाम हीच आरोग्याची गुरूकिल्ली**
वेळ : सकाळी - ५ ते १०
सायं - ५ ते ९
**आमची वैशिष्ट्ये:**
वातानुकूलित प्रशस्त जागा,
सोईस्कर वेळ, आधुनिक सामग्री,
तज्ज्ञ प्रशिक्षक
**संपर्क पत्ता : वाळके शक्ती व्यायामशाळा, 'प्राजक्त'**
**हिलटॉप रोड, अमरावती १४.**

(i) १




(ii) १




(iii) २




(iv) १




(iv) **संपर्क पत्ता**: ............... १

(२) **कथा लेखन** ६

**खाली दिलेल्या मुद्द्यावरून कथा तयार करा. कथेला योग्य शीर्षक द्या.**

मुद्दे : शिंप्याचे दुकान – रस्त्यावरून हत्तीचे नदीला जाणे – शिंप्याच्या दुकानापाशी थांबणे – खाऊ मिळणे – शिंप्याला सलाम – एके दिवशी शिंपी गंमत करतो – सोंडेला सुई टोचतो – हत्तीला वेदना – नदीजवळचे घाणेरडे पाणी सोंडेत घेतो – शिंप्याच्या दुकानात फवारा उडवतो.

प्र.५ (इ) **लेखनकौशल्य** ८

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.(शब्दमर्यादा १०० ते १२० शब्द)**

(१) **प्रसंगलेखन**




वरील प्रसंगी तुम्ही अपस्थित होता. प्रसंगाचे वर्णन करा.

(२) **आत्मकथन**

**फळ्याचे आत्मवृत्त**

१. प्राचीन रूप-काळाची गरज
२.प्राथमिक अवस्था - सेवाभावी वृत्तीमुळे समाधानी
३. वर्गात घडणाऱ्या चांगल्या वाईट घटनांचा साक्षीदार
४. आधुनिकतेचा प्रभाव
५. परोपकारी वृत्तीमुळे जीवनात समाधानी




**Best Of Luck**